|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon
'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

## जनसंपर्क विभाग

# धम्मचक्र प्रवर्तन आणि वाचन प्रेरणा दिन साजरा

जळगाव दि. १४ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या सामाजिकशास्त्र प्रशाळे अंतर्गत डॉ. आंबेडकर विचारधारा विभागाच्यावतीने धम्मचक्र प्रवर्तन आणि वाचन प्रेरणा दिनानिमित्त शनिवार दि. १४ ऑक्टोबर रोजी अधिष्ठाता प्रा. अनिल डोंगरे यांचे व्याख्यान झाले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या धर्मांतराची प्रासंगिकता या विषयावर झालेल्या व्याख्यानात डॉ. डोंगरे यांनी धर्मांतराच्या विविध पैलूवर प्रकाश टाकला. यावेळी बोलतांना प्रा. डोंगरे म्हणाले की, धम्मचक्र प्रवर्तन म्हणजे बुध्दाने दिलेले पहिले प्रवर्चन होय. ते म्हणतात धम्म म्हणजे मानवाचे मानवाशी असलेले नाते हाच खरा धर्म आहे तथागतांचा धम्म हा सदाचरणावर आधारलेला आहे. यावेळी अध्यक्षस्थानी सामाजिकशास्त्र प्रशाळेचे संचालक प्रा. अजय पाटील, प्रा. राकेश रामटेके, डॉ. उमेश गोगडीया यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे संयोजन डॉ. विजय घोरपडे यांनी केले. सूत्रसंचालन कु. मंजुषा सुर्यवंशी या विद्यार्थिनीने केले तर डॉ. समाधान बनसोडे यांनी आभार मानले.

**बातमी नं. २**

जळगाव दि. १४ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागाच्या वतीने ज्येष्ठ नागरिक सहायता दूत प्रशिक्षण वर्गाचा समारोप शुक्रवार दि. १४ ऑक्टोबर रोजी कुलगुरू प्रा.व्ही.एल. माहेश्वरी यांच्या उपस्थितीत झाला.

यावेळी कुलगुरू प्रा.माहेश्वरी म्हणाले की, विद्यार्थ्यांनी ज्येष्ठांप्रती असलेला दृष्टीकोन बदलणे गरजेचे असून या शिबीरातून गेल्यानंतर त्यांच्यासारखे पाच ज्येष्ठ नागरीक सहाय्यता दूत तयार होतील असे केले पाहिजे. ज्येष्ठांप्रती नेहमी आदराची भावना व सहकार्य करण्याची वृत्ती जोपासून विद्यार्थ्यांच्या वर्तनात नेहमी शिस्त दिसली पाहिजे. सहजता आणि आनंद, कनेक्ट आणि रिलेशन तसेच ज्ञान आणि भान यामधील फरक कसा ओळखावा असे सांगितले. आजच्या १०० सहाय्यता दूतांचा एक गृप तयार करून ज्येष्ठ नागरिकांना नेहमी मदत करावी. आजीवन अध्ययन विस्तार विभागाचे संचालक प्रा. आशुतोष पाटील यांनी प्रास्ताविक केले. या शिबीरात सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे व झालेल्या स्पर्धांमध्ये विजयी ठरलेल्या गटांना पुस्तकरूपी पारितोषिक देण्यात आले. यावेळी भावेश वाघ, नेहा शिसोदे, नंदिनी पाटील व स्वप्निल देवरे यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्र संचालन सुभाष पवार तर आभार डॉ. मनिषा जगताप यांनी मानले. यावेळी विविध ज्येष्ठ नागरिक संघाचे प्रतिनिधी व विद्यार्थी उपस्थित होते.

**बातमी नं. ३**

जळगाव दि. १४ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या संगणकक शास्त्र प्रशाळा व क्विक हिल फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने पी.एम. मुंदडे माध्यमिक विद्यालय, जळगाव येथील ५ वी ते १० वीच्या विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षे संदर्भात माहिती देतांना संगणक प्रशाळेतील विद्यार्थी सचिन पाटील व मयुर बंडे यांनी विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षेबाबत माहिती दिली. यावेळी जळगाव येथील सायबर क्राईम विभागातील पोलिस कर्मचारी अरविंद वानखडे यांनीही मार्गदर्शन केले. या कार्यक्रमावेळी शाळेचे मुख्याध्यापक कुमावत सर, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.

**बातमी नं. ३**

जळगाव दि. १४ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या माध्यमशास्त्र प्रशाळेच्या वतीने दि. १६ ऑक्टोबर रोजी माध्यमशास्त्र प्रशाळेत बातमी लेखन या विषयावर एक दिवसी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

बातमी लेखन या विषयावर कार्यशाळेचे उद्घाटन दि. १६ रोजी सकाळी १०.३० वाजता जळगाव शहरातील अप्पर पोलीस अधिक्षक चंद्रकांत गवळी यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. अध्यक्षस्थानी व्यवस्थापन परिषदेचे सदस्य राजेंद्र नन्नवरे हे असतील. उद्घाटनानंतर पहिल्या सत्रात 'बातमी लेखन आणि संपादन' या विषयावर दै.दिव्यमराठीचे निवासी संपादक दीपक पटवे मार्गदर्शन करणार आहेत. दुसऱ्या सत्रात दु.२.०० वाजता ज्येष्ठ पत्रकार दिलीप तिवारी हे 'बातमी लेखनाचे तंत्र' या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. ही कार्यशाळ नि:शुल्क असून सर्वांसाठी खुली आहे. कार्यशाळेसाठी नोंदणी करणे आवश्यक आहे. कार्यशाळेत सहभागींना प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. अधिक माहितीसाठी प्रा.सुधीर भटकर (8407922404), डॉ. गोपी सोरडे (9834166072) यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन केले आहे.

...........................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२३ दिनांक: १४ ऑक्टोबर, २०२३

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता